लक्षवेधी

# ‘ई - पशुहाट’
# पशुधन व्यापारासाठी ऑनलाईन पोर्टल




**प्रा. के.पी. जाधव**
(मो.नं. ९६०४५०१७७०)
**प्रा. पी. के. मखरे**
क.का. वाघ कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नाशिक





भारतातील दूध उत्पादन वाढवण्यासाठी भारत सरकारचा पशुसंवर्धन विभाग, दुग्धव्यवसाय विभाग आणि मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ई - पशुहाट ही एक वेबसाईट सुरु केली आहे. ई- पशुहाट हे भारतातील पशुधनाच्या व्यापारासाठी पहिले ऑनलाईन मार्केट आहे.

**ई-पशुहाट** या पोर्टलच्या माध्यमातून शेतकरी कोणकोणत्या गोष्टींचा व्यापार करू शकतात, त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### या पोर्टलच्या माध्यमातून शेतकरी कोणकोणत्या गोष्टींचा व्यापार करू शकतात?

या पोर्टलच्या माध्यमातून शेतकरी आता-

१. पशुधन (जसे की गायी, म्हशी, बकऱ्या तसेच मेंढ्या इत्यादी.)

२. गोठलेले वीर्य (गोठलेल्या वीर्याचा वापर कृत्रिम रेतनासाठी केला जातो)

३. गोठलेले गर्भ (ज्याचा वापर वंध्यत्व असलेल्या प्राण्यांमध्ये गर्भधारणेसाठी केला जातो) विकत घेऊ शकतात.

### ई-पशुहाट पोर्टलची वैशिष्ट्ये

हे पोर्टल सामान्य शेतकऱ्यांना वापरण्यासाठी अत्यंत सोप्या पद्धतीने बनविले आहे आणि सहज उपलब्ध आहे.



या पोर्टलवर माहिती तपासण्यासाठी नोंदणी करण्याची किंवा लॉगिन करण्याची आवश्यकता नाही, तथापि कोणताही व्यवहार करण्यासाठी, पूर्वनोंदणी अनिवार्य आहे. विक्रेते या पोर्टलवर एक खाते तयार करू शकतात, त्यामध्ये प्राण्यांचे तपशील, प्रतिमांसह अपलोड करू शकतात, ते संपादित करू शकतात आणि त्यांच्या संपूर्ण पत्त्यासह इतर संबंधित माहिती देऊ शकतात- जेणेकरून खरेदीदार त्यांच्यापर्यंत सहज पोहोचू शकतील.

### पशुधनाच्या ऑनलाईन बाजाराची गरज का आहे?

सध्या भारतात आणि महाराष्ट्रात पशुधन व्यापारासाठी संघटित बाजारपेठ नाही.

जे शेतकरी दुग्ध व्यवसाय करीत आहेत त्या शेतकऱ्यांचे दुग्धोत्पादन अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याचे दिसून येत आहे तसेच पशुधन व्यापारात आजकाल अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे कारण त्यांना पुरेसे पशुधन मिळत नाही. अशी स्थिती पाहता केंद्र सरकारने निर्णय घेतला आहे की देशभरातील शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करून द्यावे ज्याद्वारे शेतकरी त्यांच्या पशुधनाचा व्यापार करू शकतात आणि दुग्ध उत्पादनात वाढ घडवून आणू शकतात. दुग्ध व्यवसायायात वाढ यासोबतच भ्रूण, वीर्य यांचा देखील कृत्रिम रेतनासाठी भरपूर पुरवठा, खरेदी आणि विक्री यांची देखील सुविधा शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिलेली आहे.

### ई-पशुहाट या ऑनलाईन पोर्टलचे फायदे कोणकोणते आहेत?

१. हे पशुधन व्यापारासाठी ऑनलाईन पोर्टल असून शेतकऱ्यांना त्यांना पाहिजे असलेले पशुधन मिळविण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची गरज नाही.

२. या पोर्टलअंतर्गत शेतकऱ्यांना हवे असलेले पशुधन घरपोच उपलब्ध करून दिले जाते.

३. या पोर्टलअंतर्गत योग्य वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे; ज्याद्वारे पशुधनाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षितपणे वाहतूक केली जाऊ शकते.

### ई-पशुहाट या ऑनलाईन पोर्टलद्वारे मिळणाऱ्या सुविधा

या पोर्टलद्वारे पशुधनाशी निगडित विविध प्रकारच्या सेवा प्रदान केल्या जातात.

इच्छुक खरेदीदार ऑनलाईन पेमेंट करून लाभ घेऊ शकतात.

१. पशुधनाशी निगडित शेतकऱ्यांना जर एखाद्या प्रशिक्षणाची आवश्यकता असेल तर ते या पोर्टलद्वारे दिले जाते.

२. शेतकऱ्यांना आवश्यक असलेली विविध प्रकारची प्रमाणपत्रे देखील या पोर्टलद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जातात.

३. तसेच या पोर्टलद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिलेल्या प्रमाणपत्राची पडताळणी देखील केली जाते.

४. पशुधनाला आवश्यक असलेल्या सकस आहारासंदर्भात देखील मार्गदर्शन या पोर्टलद्वारे केले जाते.

५. या पोर्टलद्वारे जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याशी संबंधित सेवा देखील पुरवल्या जातात.

### ई-पशुहाट या पोर्टलचा लाभ कोण घेऊ शकतात ?

पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी हे या पोर्टलचे मुख्य लाभार्थी आहेत. तसेच ई-पशुहाटने काही व्यापाऱ्यांना देखील प्रमाणित केलेले आहे ते व्यापारी या पोर्टलवर व्यापार करण्यास पात्र ठरतात.

### ई-पशुहाट पोर्टल कसे वापरावे ?

शेतकऱ्यांनी हे पोर्टल वापरण्याकरिता आणि या पोर्टलवर व्यापार करण्यासाठी काही स्टेप्स वापरणे आवश्यक आहे.

१. सर्वप्रथम ई-पशुहाट ची अधिकृत वेबसाइट http://www.epashuhatt.gov.in ला भेट द्या.

त्यावर एक लॉगिन नावाची टॅब मिळेल, त्या टॅबवर शेतकरी बांधवांनी क्लिक करायचे आहे.

२. त्यानंतर शेतकऱ्यांना आपला आधार क्रमांक टाकावा लागेल-- जेणेकरून शेतकऱ्याची आधार पडताळणी करता येईल.

३. त्यानंतर शेतकऱ्यांना या पोर्टलचा वापर करण्यासाठी आपले यूजरनेम आणि पासवर्ड टाकावा लागेल जो शेतकऱ्यांना प्रत्येक वेळी या वेबपोर्टलवर लॉगिन करण्यासाठी लागेल.

४. नंतर शेतकरी बांधवाना आपली काही वैयक्तिक माहिती भरावी लागेल ज्यामध्ये संपूर्ण नाव, मोबाईल नंबर, जन्मतारीख, संपूर्ण पत्ता इत्यादी बाबींचा समावेश असतो.

५. नंतर शेतकरी बांधवाना आपल्या बँक खात्याची माहिती भरावी लागेल; जसे की खाते क्रमांक, बँकेचे नाव, शाखा इत्यादी बाबी- ज्यांचा वापर शेतकरी बांधवांना या पोर्टलवर व्यवहार करण्यासाठी करता येईल.

६. नंतर शेतकरी बांधवांना आपण राहत असलेल्या स्थानाची माहिती भरावी लागेल, ज्यामध्ये आपले गाव, तालुका, जिल्हा, राज्य, पिनकोड इत्यादी गोष्टी येतात, ज्यावरून या पोर्टलवर व्यापार किंवा व्यवहार करणारा शेतकरी कुठला आहे हे आपल्याला लक्षात येईल.

७. या सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर शेतकरी बांधवांची ई-पशुहाट या पोर्टलवर नोंदणी करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

८. नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शेतकरी बांधवांना या पोर्टलवरून पशुधनाचे खरेदी-विक्रीचे व्यवहार तसेच कृत्रिम रेतनासाठी आवश्यक असलेले वीर्य आणि गर्भ यांचे खरेदीचे व्यवहार करता येतील.

### काही विशेष बाबी

१. रोगमुक्त असलेले आणि ज्ञात अनुवंशिक गुणवत्ता असलेले वीर्य शेतकऱ्यांना कृत्रिम रेतनासाठी योग्य दरात उपलब्ध होते.

२. या पोर्टलवर पशुधनाच्या किंमतीचे मूल्यांकन खरेदीदारासाठी उपलब्ध करून दिलेले आहे.

३. या पोर्टलच्या माध्यमातून जनावरांचा व्यापार केल्यास शेतकऱ्यांना कोणत्याही मध्यस्थीचा अडथळा येत नाही.

४. या पोर्टलवरून फक्त लेबल लावलेल्या जनावरांचे आणि ज्यांचे आरोग्य कार्ड उपलब्ध असेल असेच पशुधन विक्रीसाठी उपलब्ध होते.


५. या पोर्टलची देशी गोवंश जातींचा प्रसार करण्यास आणि त्या शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय करण्यास मदत होते.

६. हे पोर्टल दूध उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्यात मोलाची भूमिका पार पाडते हे आपल्या लक्षात येईल. ■

## दिलीपराव देशमुख बारडकर यांना वार्षिक ग्रंथ पुरस्कार प्रदान

**श्री. दिलीपराव देशमुख बारडकर** यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वार्षिक ग्रंथ श्रेणीतील प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

**'सेंद्रिय व बायोडायनॅमिक पध्दतीने डाळिंबावरील कीड-रोगांचे व्यवस्थापन'** या अभ्यासपूर्ण पुस्तकासाठी त्यांना हा पुरस्कार लाभला.



पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात, मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांनी हा बहुमान स्वीकारला.

श्री. बारडकर हे 'पूर्वा कृषिदूत' परिवाराचे ऋणानुबंधी तसेच प्रस्तुत मासिकाचे ज्येष्ठ लेखकही आहेत. संबंधित सर्वांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. ■